तालुक्याचे Geo-information नकाशे तयार करून, सर्वात जास्त सेप्टीक टँक व एक खड्डा शौचालये असलेल्या गावांच्या जवळपास उपलब्ध जागा बघून, अशा प्रकारच्या शौचालयांपासून तयार होणाऱ्या मैल्याच्या व्यवस्थापनाकरिता प्रत्येक तालुक्यास एक याप्रमाणे मैला गाळ व्यवस्थापन केंद्र घेता येतील. याकरिता ट्रेचिंग/ अनप्लान्टेड/प्लान्टेड ड्राईंग बेड, टायगर वर्म, जोकासो व को-कंपोष्टींग या तंत्रज्ञानाचा वापर करून अशी केंद्रे घेता येतील. या केंद्रांकरिताचा निधी ग्रामीण लोकसंख्या गृहीत धरून, परंतु ज्या लोकसंख्येकरीता उपरोक्त IV (A) नुसार कार्यवाही करण्यात येत आहे, ती लोकसंख्या वगळून उर्वरित सेप्टीक टँक व सिंगल पिट वर आधारीत लोकसंख्येकरीता दर रू. २३० प्रति व्यक्ति याप्रमाणे निधी उपलब्ध राहील.

(C) तालुकास्तरीय मासिकपाळी व्यवस्थापन अंतर्गत, १५ वा वित्त आयोग निधीतून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ वा केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेव्दारा मान्यता प्राप्त इन्सिनरेटर देखभाल दुरूस्ती सह प्रस्तावित करावेत. इंसीनरेटर (एमपीसीबी/ सीपीसीबी मान्यता प्राप्त) व इंसीनरेटर देखभाल व दुरूस्तीची कामे, १५ वित्त आयोग निधी वा ग्रामपंचायत स्वनिधी मधून हाती घेता येतील.

(D) तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाबाबत, सोबतच्या विवरणपत्र-ब (क) मध्ये उल्लेख करण्यात आला आहे. त्याप्रमाणे कामे हाती घेण्यात यावीत.

(E) सोबतच्या विवरणपत्र-ब (इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II मधून, जिल्हयामध्ये सामुदायिक मॉडेल गोबरधन प्रकल्पाची अनुषंगिक कामे हाती घेण्यात यावीत. (जिल्ह्यासाठी किमान एक सामुदायिक मॉडेल गोबरधन प्रकल्प घेणे बंधनकारक राहील.)

५०० पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी जिल्हास्तरीय कृती म्हणून मैला गाळ व्यवस्थापनेचे काम अंमलबजावणीसाठी नियोजन करावे.

उपरोक्त मुद्दा क्रमांक III) व IV) मध्ये नमूद केलेल्या उपांगासाठी, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II नुसार, केवळ सार्वजनिक उपाय योजनांना उपांगनिहाय निधी उपलब्ध होणार आहे व उर्वरित उपाययोजना या विविध कृतीसंगमातून ( जसे १५ वा वित्त आयोग, महात्मा गांधी

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, खासदार (MPLAD), आमदार निधी (MLALAD), CSR निधी (Corporate Social Responsibility), Business Model, ॲग्री इन्फ्रा फंड, कर्ज, ग्रामपंचायत स्वनिधी, लोकसहभाग, देणगी निधी (Donor Funding) वा केंद्र व राज्य शासनाच्या अन्य योजनांतर्गत प्राप्त होणारा निधी ) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II संदर्भातील केंद्र शासन मार्गदर्शक सूचना मधील Indicative List of Sanitation Activities and Suggested Convergence Matrix नुसार हाती घेणे अपेक्षित आहे. कृतीसंगमाचा तपशिल, "प्रपत्र क्र.८" मध्ये द्यावा.

उपरोक्त इ मधील सर्व उपांगाच्या अनुषंगाने, केंद्र शासनाच्या "Plan Plus" या आज्ञावलीमध्ये, बंधनकारक व अन्य कृतीसंगमांची उपागांच्या बाबनिहाय नोंदी कराव्यात.

**ई ) माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम:-**

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत सर्व उपांगाच्या बाबतीत माहिती, शिक्षण व संवाद अनुषंगाने कशा प्रकारे कार्यवाही करावी, याबाबतचे सविस्तर विवेचन, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमध्ये विषद करण्यात आले आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर त्या त्या स्तरावरील माहिती, शिक्षण व संवाद सल्लागाराने जनजागृती करावी. ग्रामपंचायतीमध्ये राबवावयाच्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपक्रमाच्या माहितीमध्ये, जिल्हा माहिती, शिक्षण व संवाद आराखड्यामधील सर्व घटकांचा समावेश असावा. या अनुषंगाने ग्रामसभेच्या विविध बैठका, मेळावे, कार्यशाळा, अभ्यास दौरे, प्रात्याक्षिके, स्पर्धा, गृहभेटी यासारख्या संवाद माध्यमांचा देखील समावेश करून, गावस्तरीय नियोजन "प्रपत्र क्र.११", प्रमाणे करण्यात यावे. या प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमामध्ये कच-याचे पुर्नचक्रिकरण झाल्यानंतरच्या, पुर्नवापर, कमीवापर, पुर्नप्राप्ती व पुर्नचक्रिकरण ( Reuse, Reduce, Recovery & Recycle ) संकल्पनेचा अंतर्भाव असावा. याअनुषंगाने संक्षिप्त टिप्पणी ( Concept Note) विवरणपत्र-क मध्ये संलग्न करण्यात आली आहे. सदर परिस्थितीतील कोरोना प्रादुर्भाव उपाययोजना सामाजिक अंतर (Social Distancing), स्पर्श, संपर्क टाळणे इत्यादी बाबी लक्षात घेवून, Social Media Whatsapp,

Zoom, Google Meet यासारख्या साधनांचा या प्रचाराकरिता अधिकाधिक उपयोग करावा. यासर्व बाबींचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर यांची राहील. यासाठी येणारा खर्च स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद (Information Education & Communication) या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करावा. ( संदर्भाधीन क्रमांक१ येथील मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्रमांक ९.१)

**उ) क्षमता बांधणी:-**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावरील जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाने, जिल्हा वार्षिक कृती आराखडयातील (District AAP-Annual Action Plan) बाबी लक्षात घेवून, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत सर्व उपांगाच्या बाबतीत क्षमता बांधणी आराखडा तयार करावा. जिल्हा परिषदेमधील मनुष्यबळ विकास सल्लागार, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन सल्लागार यांची क्षमता बांधणी आराखडयाची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करण्याची तसेच प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राहील. प्रकल्प संचालक (स्वच्छ भारत अभियान), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर यांची यासर्व बाबींचे सनियंत्रण करण्याची व राज्यस्तरीय प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राहील. सदरचे प्रशिक्षण, ग्रामीण पाणी पुरवठा कक्षाचे, उप अभियंता/शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता, विस्तार अधिकारी (पंचायत), सरपंच/ उपसरपंच/ग्रामसेवक /ग्रामपंचायत सदस्य/ ग्रामस्तरीय पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य/ ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठा कर्मचारी/ सफाई कर्मचारी, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत, कार्यरत असणारे सर्व सल्लागार तसेच स्वच्छाग्रही/ जलसुरक्षक /व्यावसायिक संस्था/ तांत्रिक संस्था इ. यांना देण्यात यावे. याकरिता येणारा खर्च, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत मनुष्यबळ विकास संसाधन (HRD-Human Resource Development) या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करण्यात यावा.( संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनां मधील परिच्छेद क्रमांक १५.१).

ग्रामपंचायतीमधील शाश्वत स्वच्छता आराखडा व लोकसहभागीय पध्दतीने कृती आराखडा तयार करणे, नवीन कुटुंबाला शौचालये उपलब्ध राहतील, या अनुषंगाने करावयाची कार्यवाही, सामुदायिक शौचालय, शौचालयाची देखभाल व दुरुस्ती घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत जबाबदाऱ्या व कर्तव्ये, प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी, प्रकल्पासंबंधी तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन, प्रकल्पाची शाश्वत देखभाल व दुरुस्ती, या मुद्यांचा प्रशिक्षणामध्ये समावेश असावा.

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनातंर्गत, गावस्तरीय तथा जिल्हास्तरीय उपांगासाठी, UNICEF, त्यांच्या सहयोगी संस्था, PRIMOVE तथा All India Institute of Local Self Government (AIILSG), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई, यांच्या सहभागाने, विविध स्तरावरील प्रशिक्षणांच्या कालबद्ध उपांगनिहाय वेळापत्रकाची आखणी करून, Online प्रशिक्षण पद्धतीने क्षमता बांधणी करावी. जिल्ह्याच्या क्षमता बांधणीच्या गरजा व वार्षिक आराखड्यातील क्षमता बांधणीची उद्दिष्टे लक्षात घेवून, जिल्हा पाणी व स्वच्छता समिती स्तरावरून घ्यावयाच्या प्रशिक्षणाकरिता, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई, यांनी मान्यता द्यावी.

**ऊ) प्रकल्पाची अंमलबजावणी, देखभाल आणि दुरुस्ती:-** किमान खर्चाची देखभाल दुरुस्ती पद्धत, उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ, वार्षिक अंदाजित खर्च व इतर आवश्यक निधीचे नियोजन व गावातील युवकांना द्यावयाचे तांत्रिक प्रशिक्षण, या मुद्यांचा शाश्वत देखभाल व दुरूस्तीच्या अनुषंगाने प्रकल्प आराखड्यात उल्लेख करावा. प्रकल्प अंमलबजावणी तथा देखभाल दुरूस्ती यासाठी, दायित्वा संदर्भातील संकलित माहिती " प्रपत्र ०८" मध्ये नमूद करावी. प्रकल्पाच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे, बिझिनेस मॉडेल अथवा सी. एस. आर. कृती संगम किंवा ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून हाती घ्यावीत.

**ए) वार्षिक कृती आराखडा सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ अंमलबजावणी वेळापत्रक:-**

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, प्रकल्प अंमलबजावणी आराखडा अंतर्गत (Project Implementation Plan-PIP ) जिल्ह्यासाठी हाती घ्यावयाच्या कामांच्या संदर्भात, राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीने (SLSSC) मान्यता दिलेल्या गावांसाठी, प्रत्यक्ष अंमलबजावणीचे तथा विविध उपांगातंर्गत हाती घ्यावयाच्या कामांची, त्याच बरोबर पुढील ५ वर्षाकरिता शाश्वत दैनंदिन व देखभाल दुरूस्तीचे नियोजनात्मक वेळापत्रक, "प्रपत्र क्र. ०८" प्रमाणे तयार करावे. स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत जिल्ह्याद्वारे प्रत्यक्ष अंमलबजावणी करावयाच्या, वार्षिक कृती आराखड्यातील सन २०२०-२१ मधील समाविष्ठ गावांच्या मंजूरी प्रक्रिया पुर्ण झालेल्या व सन २०२१-२२ च्या वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ठ असलेल्या गावांसाठी नव्याने तांत्रिक मान्यता प्रदान करण्याऐवजी, सविस्तर प्रकल्प आराखडा प्रस्तावामध्ये आवश्यकतेनुसार दर सुधारणा करून, सुधारित मान्यतांची कार्यवाही करावी. याअनुषंगाने, तयार करण्यात आलेल्या आराखड्याबाबत, गावातील सर्व स्तरावरून प्राप्त झालेल्या, ग्रामस्थांच्या/ लोकप्रतिनिधींच्या/ गावाच्या मतदारसंघातील आमदार/खासदार यांच्या सूचना लक्षात घेवून, आराखडा अंतिम करावा. केंद्र शासनाच्या SBM-II Mobile App या मोबाईल ॲपमध्ये, गावाची अस्तित्वातील उपांगाच्या माहितीसह, सर्व माहिती अपडेट करावी. मोबाईल ॲप मध्ये माहिती संचित झाल्यानंतर, माहिती संचित केल्याच्या मोबाईल ॲपच्या स्क्रिन शॅाटसह, शासन निर्णयासोबतच्या "प्रपत्र-१" नुसार अर्ज, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांच्याकडे सादर करावा. "प्रपत्र-१" सोबत जोडावयाच्या, ठरावाचा नमुना " प्रपत्र १३" प्रमाणे राहिल. आराखडा नमुना प्रारुप, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्या www.wsso.in या संकेतस्थळावर http://www.wsso.in/ SBM२_ESTIMATE.pdf या नावाने link वर उपलब्ध आहे. त्यानुसार आराखडा तयार करावा. आराखडा तयार करण्यासाठी, https://www.sbm.gov.in वर उपलब्ध असलेल्या, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचना विचारात घ्याव्यात. प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी अंमलबजावणी, पर्यवेक्षण इत्यादी विविध बाबींसाठी लागणा-या, तांत्रिक तज्ञ तथा तंत्रज्ञानाची निवड करणे व प्रकल्पासाठी लागू

करण्यासाठी, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनामधील परिच्छेद १५.२ मधील "Administrative Charges" मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. ग्रामस्तरीय संनियंत्रणाच्या नियोजनाचे वेळापत्रक, "प्रपत्र १०" मध्ये द्यावे. गावस्तरीय सनियंत्रणाकरिता गट प्रमुख म्हणून, स्वच्छतेची आवड असणा-या, माहितगार व उस्तुक व्यक्तिची निवड करावी.

**ऐ) जेम्स पोर्टल वरून करावयाची खरेदी:-**

वार्षिक कृती आराखडा सन २०२१-२२ ते २०२४-२५ मधील समाविष्ठ गावांसाठी आवश्यकतेनुसार, सविस्तर प्रकल्प आराखड्यामध्ये अंतर्भूत असलेल्या, मंजूर अंदाजपत्रकातील ट्राय सायकल, बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल, कुटुंबस्तरीय व सार्वजनिक स्तरीय कचरा कुंड्याची खरेदी, डॉ. माशेलकर समितीद्वारा मान्यता प्राप्त तंत्रज्ञानाची/केंद्र शासनाद्वारे प्रसिद्धी केलेली विविध तंत्रज्ञानांची Compendium यामध्ये समाविष्ठ असलेले तंत्रज्ञान/Product जसे, ECOPOT GARBAGE GARDEN, Rotary Drum Composting, Biowizard Culture, इत्यादी Product ची खरेदी, केंद्र शासनाच्या https://gem.gov.in/ या संकेतस्थळावरून जेम्स पोर्टल दराने जिल्ह्याने प्राथम्याने करावी.

**ओ) गाव, तालुका/जिल्हास्तरीय प्रकल्प उपाययोजनांची अंमलबजावणी, बहिर्गमन (Exit) इत्यादींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-**

| टप्पा | कार्यवाही | कालमर्यादा | संबधित जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| नियोजन टप्पा | ग्रामपंचायतीने गटविकास अधिकाऱ्याकडे, अर्ज सादर करणे. | ग्रामसभेने ठराव पारित केल्यावर १५ दिवस. | ग्रामसेवक |
| | ग्रामपंचायतींचे अर्ज अंतिम करणे. | अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवस. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), गट विकास अधिकारी. |
| | अंदाजपत्रक तयार करणे. | २१ दिवस | दिनांक २६/११/२०२१ च्या शासन निर्णया मधील ४ (III) नुसार संबधित. |
| | तांत्रिक मान्यता देणे. | १० दिवस | |
| | प्रशासकीय मान्यता देणे. | १५ दिवस | |

| | | | |
|---|---|---|---|
| | उपाययोजनांची, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. | एक महिना | शासन निर्णय दिनांक १८/१०/२०२१ मध्ये नमूद केल्यानुसार. |
| अंमल बजावणी टप्पा | प्रकल्पाच्या कामाची प्रत्यक्ष सुरुवात. | निविदा मंजूरीअंती निर्गमित कार्यारंभ आदेशानुसार, तात्काळ कामे सुरू करावीत. | |
| | अंदाज पत्रक आराखडयाप्रमाणे काम पूर्ण करणे. | कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर १ वर्ष . | |
| | अंदाज पत्रक आराखडयाप्रमाणे काम पूर्ण झाल्याची खात्री, पुर्णत्वाच्या दाखल्यासह प्रमाणित करून, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद यांच्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करणे. | १५ दिवस | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद /गट विकास अधिकारी, पंचायत समिती / कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद/ उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद. |
| बहिर्गमन टप्पा | प्रकल्पाची शाश्वत देखभाल व दुरुस्ती | प्रकल्पाची कामे पुर्ण झाल्यानंतर तात्काळ/ कायमस्वरूपी | संबधित अंमलबजावणी यंत्रणा. |

....XXXXXXXXXX....

**विवरणपत्र-ब**
**स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत**
**घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत उपांगे.**

**घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पातील घटक खालीलप्रमाणे राहतील :-**

**घनकचरा :-**

गृह, सार्वजनिक, व्यवसाय, उद्योगामधील निरुपयोगी टाकावू, सेंद्रिय व असेंद्रिय वस्तूना **"घनकचरा"** म्हणून संबोधले जाते.

**सांडपाणी :-**

स्वयंपाक घर, स्नानगृह, कपडे धुणे इत्यादी मधून निर्माण झालेल्या पाण्याला सांडपाणी (GREY WATER) असे म्हणतात. कारण त्याचा रंग साधारणत: करडा म्हणजेच ग्रे असतो. शौचालयातून, लिच पीट मधून बाहेर पडणा-या मैला मिश्रित पाण्याला ब्लॅक वॉटर (BLACK WATER ) म्हणतात. कारण त्याच्यामध्ये मानवी मैला असतो, त्याला शोषखड्डुयाच्या माध्यमातून जमिनीमध्ये जिरविण्यात यावे.

**घनकचरा व्यवस्थापन:-**

**अ-१) घनकचरा व्यवस्थापन (कुटुंब स्तर) :-**

ग्रामपंचायतीमध्ये निर्माण होणा-या कच-याचे प्रामुख्याने खालील सात प्रकारे वर्गीकरण करावे :-

I. जैविक विघटनक्षम (सेंद्रिय - ओला कचरा ) :- उरलेले अन्न, शेतीमधून निर्माण होणारा पिक कचरा, शेण, पालापाचोळा, बाजारपेठेतील ओला व सेंद्रिय कचरा,

II. जैविक विघटनास अपात्र, निष्क्रीय कचरा ( धुळ, माती, दगडगोटे, रेती, विटा, इ.)

III. प्लॅस्टिक व थर्मोकोल कचरा:- प्लास्टिक पाकीटे व पिशव्या, वेष्टणे, बाटली व इतर थर्मोकोल /प्लास्टिकच्या वस्तू.

IV. धोकादायक कचरा (रुग्णालयीन, रासायनिक इ.) :- मुदतबाह्य औषधे, वापरलेली इंजेक्शन्स, सिरिंजेस, मासिक पाळीकरिता वापरलेले पॅड्स, डायपर्स, इत्यादी.

V. धातू व काच (सर्व प्रकारचे धातू, बॅाटल्स, फुटलेले काचेचे सामान इ,)

VI. कागद (रद्दी, वापरलेले पुठ्ठे इ.)

VII) ईलेक्ट्रॅानिक्स कचरा (ईलेक्ट्रिक वायर, खराब झालेली बॅटरी, फ्युज बल्ब, ट्युब लाईट व इलेक्ट्रानिक कचरा इ.)

**घनकचरा प्रक्रिया :-**

निर्माण झालेल्या घनकचऱ्याचे वर्गीकरण, कुटुंब स्तरावर/उद्भवाच्या जागेवरच करण्यात यावे. प्रत्येक घरांमध्येच कचरा वर्गीकरण होऊन, वर्गीकृत कचरा गोळा करण्याची यंत्रणा, ग्रामपंचायतीने प्रस्थापित करणे गरजेचे आहे. विविध प्रकारचा कचरा गोळा करण्यासाठी, प्रत्येक ग्रामपंचायतीने कचऱ्याची वर्गवारीनिहाय व्याप्ती निश्चित करून, कचरा गोळा करण्याची मोहीम राबवावी.

उपरोक्त सात प्रकारच्या घनकऱ्याचे वर्गवारीनिहाय व्यवस्थापन खालीलप्रमाणे करावे:-

I) **<u>जैविक विघटनक्षम (सेंद्रिय - ओला कचरा) कचऱ्यावर खालील पद्धतीनुसार प्रक्रिया करावी :-</u>**

- **पाळीव प्राण्यासाठी खाद्य** :- न कुजलेला, ओला कचरा गुरांसाठी खाद्य म्हणून वापरता येण्याजोगा असल्यास, गुरांचे खाद्य म्हणून वापरावा.
- प्लास्टीक डब्यांत, कंपोष्ट बिन, कल्चर (COMPOST BIN, CULTURE) च्या सहाय्याने शास्त्रोक्त कंपोस्ट :- डॉ. भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र ( BARC- BHABHA AUTOMIC RESEARCH CENTRE) यांनी संशोधन करून निर्माण केलेल्या कंपोस्ट बिन सारख्या कंपोस्ट बिनचा वापर करून, BARC निर्मित CULTURE द्वारे कुटुंबस्तरावरील ओल्या सेंद्रिय कचऱ्याची विल्हेवाट खत तयार करून, कुटुंबस्तरावरच प्रक्रिया करावी. याकरिता स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. कंपोष्ट बिन व कल्चर (Compost Bin, Culture)च्या उत्पादकांची यादी/ माहीती BARC च्या www.barc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कंपोस्ट बीन व CULTURE खरेदी करण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पद्धतीचा अवलंब करावा.
- **कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खतखड्डा:-** कचरा उपलब्धतेच्या प्रमाणात, अंदाजे ३ ते ४ फुट लांबी रुंदीचा व ३ फुट खोलीचा खड्डा करून, ओला कचरा, शेण व माती यांचे आलटून

पालटून थर करून खड्ड्यामध्ये टाकावे. खड्डा भरल्यानंतर, सुमारे ५-६ महिन्याच्या कालावधीत निर्माण झालेले खत शेतीसाठी वापरावे. याचप्रमाणे सुमारे ३ ते ४ फुट व्यासाचा व ३ फुट खोली या प्रमाणात गोलाकार वीटकाम करुन खतखड्डा तयार करता येईल. यामध्ये कचरा व माती यांचे आलटुन पालटुन थर टाकून खड्डा भरावा. खत तयार होण्यासाठी अधूनमधून पाणी शिंपडण्यात यावे. कचऱ्यामध्ये काही प्रमाणात असेंद्रिय कचऱ्याच्या शक्यतेनुसार तयार खत चाळून घेऊन, त्या खताचा वापर शेतीसाठी /बगीच्यासाठी करावा.

- **नाडेप खत टाकी :-** ओला व सुका सेंद्रिय कचरा बऱ्याच प्रमाणात निर्माण होत असल्यास, नाडेप खत टाकी घ्यावी. कंपोस्टिंग अथवा खत निर्मिती प्रक्रिया करण्यासाठी, जमिनीवर ३ फुट उंच, ४ फुट रुंद व गरजेप्रमाणे लांबी अशा प्रकारे टाकीचे बांधकाम करावे. टाकीमध्ये कचरा भरताना, कचरा व मातीचे थर आलटुन पालटून भरावे. शेवटचा थर मातीचा असावा. खत तयार होण्यासाठी अधूनमधून पाणी शिंपडण्यात यावे. तयार खत चाळून घेऊन, खताचा वापर करावा.
- **गांडुळ खत निर्मिती:** ओल्या कचऱ्याचे उत्कृष्ट खतात रुपांतर करण्यासाठी, गांडुळांचा शास्त्रोक्तरित्या उपयोग करून घेता येईल. याकरिता तालुका स्तरावरील,कृषी विभागाच्या शेतकी शाळा यांचेशी संपर्क साधून, गांडूळ उपलब्ध करून घेता येईल.

**II) जैविक विघटनास अपात्र, निष्क्रीय कचऱ्यावर खालील पद्धतीनुसार प्रक्रिया करावी :-**
माती, दगडगोटे, विटा इत्यादी वेगळे काढावे. सदर माती, दगडगोटे, विटाचा पुर्नवापर घराभोवताली भराव करण्यासाठी संबधित कुटुंबाकडून करावा.

**अ-२) घनकचरा व्यवस्थापन (सार्वजनिक स्तर) :-**

सार्वजनिक घनकचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी झाडलोट व्यवस्था, कचरा एकत्रिकरण, तीन चाकी ट्राय सायकल ( TRICYCLE) द्वारे कचरा वाहतुक व्यवस्था ग्रामपंचायतीने करून, कचऱ्यावर अंतिम प्रक्रिया ग्रामपंचायत द्वारा करावी. कचऱ्याचे कुटुंबस्तरावर वर्गीकरण होईल, याअनुषंगाने ग्रामपंचायतीने जास्तीत जास्त जनजागृती करावी. अशा प्रकारे

कुटुंबस्तरावरील वर्गीकृत कच-याचे वहन प्रक्रियास्थळी/साठवण शेड पर्यंत ग्रामपंचायतीने करावे.

- **कचरा प्रक्रिया स्थळ :-** साधारणत: गावाबाहेर योग्य जागा निर्धारित करुन, सदर जागेवर शेड बांधून, जागेसाठी कुंपण व रस्ता याची सोय करावी.
- **पुर्नवापर व पुर्नचक्रिकरण :-** वर्गीकृत सुक्या कचऱ्यातील कागद, कापड, चिंध्या, काच, रबर, धातू, चप्पल, टायर, केस, शालेय पिशव्या इ. प्रकार, वेगळ्याने साठवून, स्थानिक भंगार व्यावसायिकांना विक्री करावी.

❖ **ओला कचरा व्यवस्थापन (सार्वजनिक स्तर) :-**

- **कंपोस्ट खड्डा :-** गावात तयार होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात आवश्यक लांबींचे खड्डे तयार करावेत.
- **बांधकाम टाकीद्वारे कंपोस्ट खत :-** साधारणपणे ५ ते ६ फुट व्यासाचे व ३ फुट खोलीचे वीट बांधकामाचे गोल खड्डे गरजेप्रमाणे कायमस्वरुपी बांधण्यात यावेत. उर्वरीत कार्यवाही कंपोस्ट खड्डा पद्धतीप्रमाणे राहिल.
- **नाडेप खत टाकी :-** ग्रामपंचायतीमध्ये तयार होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात योग्य आकारमानाचे खड्डे तयार करावेत.
- **गांडुळ खत प्रक्रिया :-** ग्रामपंचायत पातळीवर गांडुळ खत प्रक्रिया ढीग, चार कप्पे टाकी, एक टाकी या तीनपैकी एका प्रकाराद्वारे करावी. एक टाकी पध्दतीमध्ये टाकी १-२ दिवसांतच भरावी. या टाक्यांची संख्या कचऱ्याच्या प्रमाणामध्ये ठेवावी. चार कप्प्यांच्या टाकीची पध्दत देखभालीच्या दृष्टीने सोयींची आहे. गांडुळ खत प्रक्रिया सावलीच्या ठिकाणी करावी. खतढिगाच्या ओलेपणासाठी आवश्यकतेनुसार पाणी शिंपडण्यात यावे, जेणेकरून गांडूळ जिवंत राहतील.

**<u>ब) सांडपाणी व्यवस्थापन:-</u>**

सांडपाणी व्यवस्थापनासाठी कुटुंब व सार्वजनिक स्तरावर कृती कार्यक्रम आखण्यात यावा. यामध्ये प्रामुख्याने खालील तंत्रज्ञानांचा वापर करावा. कुटुंब स्तरावरील सांडपाणी व्यवस्थापनाचे काम स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत करता येणार नाही. तथापि सदरचे

काम ग्रामपंचायतीच्या इतर स्त्रोतामधून कृतीसंगम (CONVERGENCE) करावे. सार्वजनिक स्तरावरील सांडपाणी व्यवस्थापनाचे काम स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत करावे.

**ब-१) सांडपाणी व्यवस्थापन ( कुटुंबस्तर):-**

- **पाईप्ड रुट झोन पध्दतीसह परसबाग :-** घराभोवती मोकळी जागा उपलब्ध असल्यास, या पध्दतीचा वापर करुन सांडपाण्याचे व्यवस्थापन करावे.
- **साधी परसबाग :-** घराभोवती मोकळी जागा असल्यास, सांडपाणी गाळकुंडी मार्फत पाटाद्वारे वाफ्यांमध्ये सोडावे.
- **पाझरखड्डा** ( leach pits ) :- घराभोवती परसबागेसाठी मोकळी जागा नसल्यास व सांडपाण्याचे प्रमाण जास्त असल्यास पाझरखड्याद्वारे पाणी जामिनीमध्ये जिरवावे.
- **शोषखड्डा** (Soak pits) :- घराभोवती परसबागेसाठी जांगा उपलब्ध नसल्यास व घरातून येणारे सांडपाणी मर्यादित असल्यास, शोषखड्ड्याद्वारे शास्त्रोक्त पद्धतीने पाणी जमिनीत जिरवावे.

**उपरोक्त कुटुंबस्तरावरील बार्बीसाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय नाही.**

❖ **सांडपाणी व्यवस्थापन ( सार्वजनिक स्तर):-**

सांडपाण्याचे व्यवस्थापन कुटुंब स्तरावर शक्य नसल्यास, अशा सांडपाण्यावर सार्वजनिक स्वरुपात प्रक्रिया करावी. अशा सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी, ग्रामपंचायतीची असेल. गावामध्ये सार्वजनिक नळकोंडाळी, सार्वजनिक हातपंप अथवा विहिरी असल्यास, त्या ठिकाणी तयार होणाऱ्या सांडपाणी व्यवस्थापनासाठी, पुढील पर्यायांचा विचार करावा :-

- **वृक्षारोपण :-** परिसरातील मोकळया जागेवर, या पाण्याचा उपयोग करुन वृक्षारोपण करावे.
- **पाझरखड्डा :-** त्या परिसरात वृक्षारोपणासाठी मोकळी जागा उपलब्ध नसल्यास, त्या ठिकाणी सार्वजनिक पाझरखड्डा करावा. अस्तित्वातील जलस्त्रोतांचे पाणी पाझरखड्ड्यामुळे दुषित होणार नाही, याकरिता सुरक्षित अंतराची मर्यादा ठेवण्याची दक्षता घ्यावी. हा खड्डा ९ इंच

जाळीदार वीटकामाने गोल आकाराचा, सुमारे पाच फुट व्यासाचा करुन, त्यावर चेंबर कव्हर बसवावे. या खड्डुयामध्ये गाळकुंडीमधून सांडपाणी प्रवाहित करावे.

- **सार्वजनिक सांडपाणी व्यवस्थापन :-** सार्वजनिक सांडपाण्याचे जागेवर व्यवस्थापन करणे शक्य नसल्यास, ते पाणी अन्यत्र वाहून नेऊन त्याचे व्यवस्थापन करावे. गटारांच्या व नालींच्या बांधकामाकरीता, **स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ मधून निधी अनुज्ञेय राहणार नाही.** गटाराच्या व नालीचे बांधकाम ग्रामपंचायतीच्या इतर स्रोतातून कृतीसंगम (Convergence) करावे. सार्वजनिक सांडपाणी वेगवेगळया पध्दतींच्या गटारांमधुन अन्यत्र वाहून नेण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीमार्फत केली जाते. मात्र हे पाणी गावांबाहेर नेल्यावर ते सांडपाणी नदीनाले, तलाव इत्यादीमध्ये विनाप्रक्रिया सोडले जाते अथवा त्याचे त्याच ठिकाणी डबके तयार होते, अशी बाब टाळण्यात यावी.

**सार्वजनिक सांडपाणी व्यवस्थापनाकरिता खालील प्रकारच्या उपाययोजना घेता येतील :-**

- **सार्वजनिक पाझर खड्डा-:**गटारात येणारे सांडपाणी मर्यादित घरातून (१५-२०) येत असल्यास, ते पाणी त्या गटाराच्या शेवटी सुमारे ५ फूट व्यासाचा व ३ फुट खोलीचा वीट बांधकामाचा गोल खड्डा सार्वजनिक पाझरखड्डा घेवून त्याला जमिनीत जिरवावे.
- **सांडपाणी स्थिरीकरण तळे:-** सांडपाण्यावर अंतिम प्रक्रियेसाठी सांडपाणी स्थिरीकरण तळयाचा वापर करण्यात यावा. या पद्धतीमध्ये सांडपाणी एकापुढे एक अशा जोडलेल्या तीन तळ्यांच्या समुहामधून सोडण्यात यावे. प्रथम सांडपाणी निर्वातीय (Anaerobic) तळयामध्ये सोडावे, त्यानंतर ते संमिश्र प्रक्रिया (Facultative) तळयामध्ये जाईल व शेवटी परिपक्वता तळयामध्ये (Maturation pond) जाईल. परिपक्वता तळयामधून प्रक्रिया झालेले पाणी शुद्ध स्वरूपाचे असल्याने, ते बाग अथवा शेतीसाठी वापरावे. ग्रामपंचायतीच्या भौगोलिक उतारानुसार, पाणी एकापेक्षा जास्त ठिकाणी उताराने जात असल्यास, एकापेक्षा जास्त ठिकाणी सांडपाणी स्थिरीकरण तळे (Stabilization pond) कराव्यात.

उताराच्या दिशेने नाल्या अगोदर जागा उपलब्ध होवू न शकल्यास, सांडपाण्याच्या नाल्यामध्येच एका खाली एक अशा पद्धतीने ३ अथवा जास्त बंधारे घालून, सांडपाणी अडविण्यात यावे. अशा प्रकारचे बंधारे तात्पुरते, वनराई पध्दतीने अथवा प्रचलित पध्दतीचे घ्यावेत.

- केंद्र शासन मार्गदर्शक सुचनेमधील परिच्छेद क्रमांक १८.१ अन्वये राज्यास भौगोलिक स्थितीनुसार आवश्यक उपाययोजना करण्याची मुभा दिली आहे.
- सांडपाणी व्यवस्थापनासाठी पुढीलप्रमाणे तंत्रज्ञानाचा जिल्हास्तरावर मान्यता घेऊन वापर करता येईल:-
  - Duckweed Based Waste Water Treatment
  - Phytorid Technology (developed by NEERI)
  - Anaerobic Decentralized Waste Water Treatment
  - Decentralized Waste Water Treatment (DEWATS), Tiger Bio Filter
  - Johkasou

**क) तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन :-**

**<u>प्लास्टिक व थर्मोकोल कचऱ्यावर खालील पद्धतीनुसार प्रक्रिया करावी</u> :-**

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविताना, प्लास्टिक निर्मिती, प्लास्टिक कचरा, प्लास्टिकची पुर्नप्रक्रिया इ. बाबत ग्रामस्तरीय व्यवस्थापनाची, यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याकरिता, महाराष्ट्र शासनाच्या प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनेबाबतचा सन २०१८ च्या अधिनियमास अधिन राहून प्रक्रिया करावी. राज्यामध्ये लागू असलेली प्लास्टिक वरील बंदी व प्लास्टिकचे पर्यावरणावरील विपरीत परिणाम लक्षात घेता, सर्व प्रकारचा प्लास्टिक कचरा उद्भवाच्या ठिकाणी वेगळयाने तात्पुरती साठवण करुन, ग्रामपंचायतीच्या सुरक्षित जागेवर कालबद्ध एकत्रित करावा. तद्नंतर सदर प्लास्टिक कचरा, तालुका स्तरावर उभारण्यात येणा-या प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिटकडे वाहनाने स्थलांतरीत करावा व त्यानंतर सदर कचऱ्याचा शास्त्रोक्त पुर्नवापर अथवा शास्त्रोक्त विल्हेवाट लावावी. याअनुषंगाने अनुभवी संस्थांची वा प्राधिकृत व्यक्ती/संस्थांशी संपर्क करुन, निरूपयोगी

प्लास्टिकचे गट निहाय व जिल्हानिहाय संकलन व वहन याकरीता कालबद्ध कार्यक्रम आखावा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी, संबधित पंचायत समितींच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने, सदर प्राधिकृत व्यक्तिशी संपर्क साधून, प्लास्टिक वहन व विक्री कार्यक्रमाचे नियोजन करावे. त्याअनुषंगाने प्लास्टिक कचरा ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा स्तरावर साठविण्यात/ संकलित करण्यात यावा.या करिता स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II च्या अनुषंगाने केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या प्लास्टिक कचरा व्यवस्थापनच्या मार्गदर्शिकेचा उपयोग करावा.

प्लास्टीक कचरा व्यवस्थापनांतर्गत खालील प्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे:-

- गावातील सर्व कुटुंबस्तरीय, संस्थास्तरिय व अन्य सर्व स्तरावरील कचरा मुल्यांकन.
- प्लास्टीकमुळे होणारे खालील हानिकारक दुष्परीणाम ग्रामस्थांना निदर्शनास आणावे.
    - प्लास्टीक फैलावामुळे पर्यावरण ऱ्हास
    - निसर्गाचे विद्रूप रूप
    - जमिनीची पत घसरण
    - प्लास्टीक उघडयावर जाळण्यामुळे निर्माण होणाऱ्या विषारी वायुमूळे गंभीर प्रकृति अस्वास्थ्य
    - प्लास्टीक ढिगाऱ्यातील विघटन प्रकियेतील LEACHING पाझरण्यामुळे जमीन व जल प्रदुषण
    - पाळीव किंवा वन्य जनावरांच्या पोटात प्लास्टीक शिरकाव
- REFUSE, REDUCE, REUSE AND WASTE SEGREGATION AT SOURCE
- प्रत्येक दारातून कचरा संकलन प्रणाली.
- कचरा वर्गीकरण, वर्गीकृत कचरा संकलन कार्यप्रणाली विकसित करावी.
- संकलन केलेल्या कचऱ्यासाठी गावस्तरिय साठवन शेड व्यवस्था निर्माण करावी.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षापर्यंत कचरा वहन करणारी वहन व्यवस्था प्रस्थापित करावी.

- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षाची उभारणी करावी. प्लास्टीक श्रेडिंग/ बेलिंग मशिन व्दारा पुर्नचक्रीकरण शक्य नसलेल्या कचऱ्यावर प्रक्रीया.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापनांतर्गत प्रकिया केलेला कचरा सिमेंट कारखाने वा रस्ते बांधकामासाठी वापर.
- पुर्नचक्रीकरण विल्हेवाटीसाठी FORWARD LINKAGES प्रस्थापित करावेत.
- कबाडीवाला यांचे स्थळ निश्चीती.
- राज्य / जिल्हा / ग्राम पंचायतीच्या जबाबदाऱ्या सुनिश्चीत कराव्यात.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापनासाठी वित्तीय व्यवस्थापनाचे नियोजन करावे.

**प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष- (तालुकास्तरीय)**

- प्लास्टीक कचरा व्यवस्थापनकक्ष सर्वसाधारणत: तालुका स्तरावर हाती घ्यावा, याव्दारे तालुक्यातील सर्व गावांचा साठवण केलेला गावस्तरीय प्लास्टीक कचरा वहन करून तालुका प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षामध्ये आणल्यानंतर त्यातील पुनर्चक्रकिरण शक्य असलेला कचरा वेगळा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षा करिता उपयुक्त सोईची जागा सुनिश्चीत करून, सदर जागेवर प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षाचे बांधकाम हाती घेण्याचे प्रस्तावित करावे.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्ष सुरळीतपणे चालविण्यासाठी सेल्फ हेल्प् ग्रुप / एनजीओ / खाजगी संस्थाचा सहभाग घेण्यात यावा.
- सदर कक्षामध्ये श्रेडींग मशिन, बेलिंग मशिन व डस्ट रिमुव्हर मशिन एकत्रित कचऱ्याचे मुल्यांकन क्षमतेसाठी बसविण्यात याव्यात.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षाचे स्थळ शक्यतो सिमेंट कारखान्याजवळ असणाऱ्या जागेस प्राधान्य द्यावे, जेणेकरून प्रक्रिया केलेला कचरा विल्हेवाट करणे सोईचे होईल.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षास विद्युत पुरवठा व पिण्याचे पाणी २४ तास उपलब्ध असावे अश्या ठिकाणी प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्ष स्थळ निश्चीत करावे.

- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्ष स्थळ पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून दूर अंतरावर असावे.
- गावस्तरीय साठवण केलेला कचरा वहन करण्यासाठी अस्तित्वातील नागरी /ग्रामीण क्षेत्रासाठी कार्यरत असलेल्या संस्था/ सेवा पुरवठादार यांच्या याद्या तयार करुन ग्राम पंचायत कार्यालयात उपलब्ध असाव्यात.
- कचरा वहन करणाऱ्या संस्थाचे आवश्यकतेनुसार जिल्हास्तरिय एम्पॅनेलमेन्ट करण्यात यावे.
- प्लास्टीक कचरा पुर्नचक्रिकरण करणाऱ्या अस्तित्वातील यंत्राणांची/ कबाडीवाला यांची यादी तयार करुन ग्राम पंचायतीमध्ये सदर यादी नेहमीसाठी उपलब्ध असावी.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी जिल्हास्तरावर यंत्रणांचे एम्पॅनेलमेन्ट करावे.
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन कक्षाची क्षमता निश्चीत करतांना नजिकच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वातील/प्रस्तावित प्लास्टीक कचऱ्याच्या प्रक्रीये प्रकल्पा संदर्भात, जिल्हास्तरावरून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधावा.
- प्रक्रिया केलेला, बारीक केलेला प्लास्टीक कचरा रस्ते बांधकामात किंवा सिमेंट कारखान्यात इंधन म्हणून वापरता येईल.
- विविध प्रकारच्या प्लास्टिक व थर्मोकोलवरील बंदीबाबत पर्यावरण विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे प्रत्येक ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांनी तंतोतंत पालन करावे. सदर परिपत्रक महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- थर्मोकोल विल्हेवाटीकरिता ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाशी संपर्क साधून, अधिकृत संस्थामार्फत थर्मोकोल कचरा विल्हेवाट बाबत कार्यवाही करावी.
- PRO व प्रत्येक ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांच्या दरम्यानचा आर्थिक व्यवहाराचा सर्व लेखा संबधित कार्यालयाने अद्ययावत ठेवावा.

- ग्रामपंचायतीने निवड केलेल्या जागेवरील गोळा करण्यात आलेला प्लास्टिक कचरा उडून जावू नये म्हणून, जाळीद्वारे आच्छादित करून साठवण करण्याची जबाबदारी, गावाची राहिल. प्लास्टिक कचऱ्याचे कॉम्पॅक्शन (COMPACTION) पद्धतीने तयार केलेले गठ्ठे, संबधित उत्पादकाकडे पुढील विघटन प्रक्रिये करीता PWMU कडे पाठविण्याची जबाबदारी गावाची राहिल.
- गट विकास अधिकारी, पंचायत समिती करारबद्ध संस्थेने प्लास्टिक कचऱ्याच्या प्रक्रियेसाठी कॉम्पॅक्शन व क्रशर ( COMPACTION व CRUSHER) मशिनची व्यवस्था करावी. या मशिन्स चालविण्याकरिता लागणाऱ्या विजेचे देयक अदा करण्यासाठी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्षाच्या उपांगाच्या अंदाजपत्रकीय प्रस्तावामध्ये निधीस्रोतनिहाय तरतूद असावी.
- प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे शक्य नसल्यास, अशा प्लास्टिक कचऱ्याचे वेगळे गठ्ठे तयार करून, विल्हेवाटीच्या ठिकाणी प्रकल्पापर्यंत प्रक्रिया/वहन करण्याचे प्रस्तावित करावे.
- प्लास्टिक कचऱ्याच्या प्रक्रियेकरिता आवश्यक कर्मचाऱ्यांची निवड स्थानिक ग्रामस्थांमधून केल्यास, संबधितांना प्रशिक्षित करावे.
- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी PRO यांच्यासोबत करारनामा करून, कचऱ्याच्या वर्गवारीनिहाय मोबदला दर निश्चिती करावे.
- PRO यांच्या कामाच्या आधारे, मुदतवाढ संपलेला करारनामा पुढे चालू ठेवावे किंवा कसे, तसेच काम असमाधानकारक असल्यास, करारनामा खंडीत करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना राहतील. याबाबींचा समावेश करारनाम्यामध्ये करावा.

**धोकादायक कचऱ्यावर (रुग्णालयीन, रासायनिक इ.) खालील पद्धतीनुसार प्रक्रिया करावी :-**

- ग्रामपंचायत हद्दीमधील कुटुंबाकडून वापरण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन पॅडची विल्हेवाट, ग्रामपंचायतीमध्ये बसविण्यात आलेल्या इनसिनरेटर मध्ये, जाळून कुटुंबातील व्यक्तिने व्यक्तिशः करावी. तसेच केंद्र शासनाच्या मे २०१८ च्या सॅनिटरी कचरा व्यवस्थापन बाबत सूचनांद्वारे ग्रामपंचायतीने सॅनिटरी नॅपकीन पॅडची विल्हेवाटीसाठी परिस्थितीनुरूप अंमलात

आणावयाच्या तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन केले आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक ग्रामपंचायतीने सॅनिटरी कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) च्या संदर्भात केंद्र शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक ६.१०.३ मध्ये सॅनिटरी पॅडची विल्हेवाट लावण्याकरिता निधीची तरतूद उपलब्ध आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय यांच्याद्वारा निर्गमित दिनांक २८ मार्च, २०१६ च्या बायो मेडीकल कचरा नियम २०१६ (Bio Medical Waste Rules-२०१६ ) अन्वये बायो मेडीकल वेस्ट बाबत व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील. हॉस्पिटल/वैद्यकीय संस्था इत्यादीमधील दूषित व रासायनिक कचऱ्यासंदर्भात उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार प्रक्रिया करावी. रूग्णालयीन कचरा, वापरलेले इंजेक्शन्स व मुदतबाह्य औषधे इत्यादी, इनसिनरेटरमध्ये जाळून अशाच प्रकारे विल्हेवाट लावावी. उपरोक्त कचरा धोकादायक असल्यामुळे, इतर कचऱ्यामध्ये मिसळणार नाही, याची दक्षता घ्यावी. याकरिता जिल्हा परिषदांनी ग्रामपंचायतींना त्यांचे नियोजन व क्षमता बांधणी करिता सहाय्य करावे.

**धातू, काचेच्या,कागदाच्या व ईलेक्ट्रॉनिक्स कचऱ्यावर खालील पद्धतीनुसार प्रक्रिया करावी :-**

धातू, काच, व कागद इत्यादीं प्रकारच्या कचऱ्याची, संबधित ग्रामपंचायतीने वहन करून भंगार विक्रेत्यांना विक्री करावी. यामाध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची मालकी ग्रामपंचायतीची असेल.

ईलेक्ट्रॉनिक्स कचऱ्याच्या अनुषंगाने, केंद्र शासनाच्या दिनांक २३ मार्च, २०१६ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करावी.


**ड) जिल्हास्तरीय मैला गाळ व्यवस्थापन (FECAL SLUDGE MANAGEMENT) :-**

राज्यातील विविध ग्रामपंचायतीमध्ये व त्याअनुषंगाने पंचायत समितीच्या होत असणाऱ्या शाश्वत स्वच्छता आराखड्यातून, त्या त्या ग्रामपंचायतीतील/ पंचायत समितीतील, एक खड्डा पध्दतीचे शौचालय (SINGLE PIT TOILET), दोन खड्डा पध्दतीचे शौचालय (TWIN PIT TOILET) व सेप्टीक टँक (SEPTIC TANK) पध्दतीचे शौचालय व शौचालय वापरात असलेल्यांची माहिती

उपलब्ध होणार आहे. सदर प्रकारच्या शौचालयांच्या याद्या, ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध राहतील. यापैकी एक खड्डा पध्दत असलेले शौचालय हे काही दिवसात भरल्यानंतर, पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे आवश्यक असल्याने, सदर घरमालकांना सदर शौचालयाकरिता, शास्त्रोक्त पद्धतीने दुसरा खड्डा खोदून पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक राहील. दुसरा खड्डा खोदण्यास जागा उपलब्ध होत नसल्यास, सदर घरमालकाच्या स्वखर्चाने दोन खड्डे असलेले, दुसरे शौचालय बांधावेत. हे ही शक्य नसल्यास, ग्रामपंचायतीने अशा कुंटुबांच्या सोयीकरिता, सार्वजनिक शौचालय पाण्याच्या सोयीसह सार्वजनिक संकुल बांधकाम या स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II उपांगातून निकषाचे पालन करून बांधावीत.

**<u>मैला गाळ व्यवस्थापनासाठी सर्वसाधारण प्रक्रिया:-</u>**

**Figure 3**: Steps for planning and implementation for FSM in a District




DPR: Detail Project Report; FS: Faecal Sludge; E&T: Emptying and Transportation; FSTP: Faecal Sludge Treatment Plant.

**मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत सर्वसाधारण प्रक्रिया:**

- सदर मैला गाळ व्यवस्थापन जिल्हा स्तरीय कृति म्हणून राबवावयाचे असल्याने, यासाठी आवश्यकतेनुसार,व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरावर अंमलबजावणी करणाऱ्या संबधीतांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या जिल्हास्तरावर निश्चीत कराव्यात.
- जिल्ह्यातील सर्व गावातील सिंगल पिट शौचालये, सेप्टिक टँक शौचालयाची माहिती प्रकल्पाचे नियोजनासाठी प्राप्त करून घ्यावी.
- रेट्रोफिटींग शक्य नसलेल्या शोचालयांसाठी, मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्पाची क्षमता निर्धारित करावी.
- प्रथमत: नजिकच्या १० ते १५ किमी अंतरावरच्या अस्तित्वातील मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्पातून कोट्रिटमेन्टव्दारा प्रक्रिया करण्याचे नियोजन करावे. उर्वरित मैला प्रकिया करण्यासाठी, उपलब्ध जागेवर ट्रेंचिंग / ड्राईंग बेड / प्लांटेड ड्राईंग बेड असे प्रकिया प्रकल्प नियोजित करावे.
- प्रकिया केलेल्या मैला गाळाचे कोकम्पोस्टींग करून, खताव्दारे महसूल निर्मीती नियोजन करावे.
- परिसरातील वैध नोंदणीप्राप्त शास्त्रोक्त पध्दतीच्या मैला गाळ उपसा करणाऱ्या व प्रकिया प्रकल्पापर्यंत वहन करणाऱ्या संस्थांचे सेवा पुरवठादारांच्या याद्या जिल्हा स्तरावर तयार करुन सर्व ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन द्याव्यात.
- नविन संस्थाचे सेवा पुरवठादारांचे जिल्हास्तरीय एम्पॅनेलमेन्ट आवश्यकतेनुसार करावे.
- मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी जिल्हास्तरावर यंत्रणांचे एम्पॅनेलमेन्ट करावे.
- मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाची क्षमता निश्चीत करतांना नजिकच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मैला गाळ व्यवस्थापनाच्या प्रक्रीये संदर्भात, जिल्हास्तरावरून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधावा.
- मैला गाळ व्यवस्थापनासाठी जिल्हा स्तरावर सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे तयार करावेत.

याचप्रमाणे दोन खड्डे शौचालयांपैकी, एक खड्डा साधारणत: ५ ते ६ वर्षात भरतो. तद्नंतर या खड्ड्यांचा वापर करुन, दुसरा खड्डयाचा वापर सुरु करण्यात येतो. अशा प्रथम खड्डयातील मल, साधारणत: १ वर्षात पुर्णपणे कुजून, त्याचे सोनखत तयार होते. अशा प्रकारच्या सोनखत तयार झालेल्या खड्डयांची माहिती, ग्रामपंचायतीतील मैला गाळ व्यवस्थापना संदर्भातील माहिती संकलित करावी. जेणेकरून तयार झालेले सोनखत वेळोवेळी काढता येईल.

**सेप्टीक टँक (SEPTIC TANK) :-**

सेप्टीक टँक असलेल्या शौचालयामध्ये निर्वातीय (ANAEROBIC) स्थितीमुळे, एका विशिष्ट प्रकारच्या जीवाणुमुळे सेप्टीक टँक मधील मैल्याचे पाचनक्रियेमुळे मैल्याचे गाळात रुपांतर होवून, सदर गाळ तळाशी जमा होतो. तथापि, काही काळानंतर गाळ जास्त प्रमाणात जमा होवून, मैल्याची पाचनक्रिया मंदावते व सदरचा मैलागाळ सेप्टीक टँकच्या आऊटलेट पाईपमधून ओव्हरफ्लो होत असतो. अशा बाबतीत, सेप्टीक टँकमधील गाळाचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या गाळाचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, ग्रामपंचायतीच्या शाश्वत स्वच्छता आराखड्यातील गावामध्ये अस्तित्वात असलेल्या सिंगल पिट, सेप्टीक टँक शौचालयांची यादी व त्यांचा अंतिम गाळ उपसा दिनांक याबाबतची माहिती, ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असावी. सर्वसाधारणपणे सेप्टीक टँक उपसा करणाऱ्या संस्थाची यादी, नगरपरिषद /नगरपालिका /महानगरपालिका इत्यादींकडे उपलब्ध असते. संबधित ग्रामपंचायतींनी नजिकच्या नगरपरिषद /नगरपालिका /महानगरपालिका इत्यादींकडून अशा संस्थांची माहिती घ्यावी. अशा संस्थांचे सेप्टीक टँक गाळ उपसा करण्याकरिता, किमान दर असणाऱ्या संस्थेकडून सेप्टीक टँक गाळ उपसा करण्याच्या कार्यवाहीचे नियोजन करावे.

I) गावामध्ये अस्तित्वात असलेले सिंगल पिट, ट्विन पिट तसेच सेप्टीक टँक अशा प्रकारच्या शौचालयाची शाश्वत स्वच्छता आराखडयामध्ये उल्लेख असणे आवश्यक आहे.

II) सिंगल पिट, तसेच सेप्टीक टँक मधील मैला गाळ, विनिर्दिष्ठ मल विघटन प्रक्रिया केंद्रावर (STP- SEWAGE TREATMENT PLANT ) विघटन प्रक्रिया को-ट्रिटमेंट (CO-TREATMENT) करण्याकरिता भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाद्वारे निर्दिष्ठ ठिकाणी वाहून न्यावे. सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करून वहन करणाऱ्या संस्थेस भाडे देण्याची जबाबदारी संबधित

ग्रामपंचायतींची राहील. मल विघटन प्रक्रिया केंद्र (STP- SEWAGE TREATMENT PLANT ) व अशा सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करून वहन करणाऱ्या सर्व संस्थाच्या नोंदी संबधित जिल्हा परिषद/ग्रामपंचायतीकडे अदययावत याद्या उपलब्ध असाव्यात. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी, पंचायत समिती गटातील ग्रामपंचायतींचा गट करून, सर्व संबधित ग्रामपंचायतींशी समन्वय साधावा व अशा ग्रामपंचायतींना सेप्टीक टँकमधील गाळ उपसा करून वहन करणाऱ्या संस्थांची सेवा, उपलब्ध होईल, याबाबतचे नियोजन करून, त्यासंर्भातील कामाचे सनियंत्रण करावे.

I) सेप्टीक टँक मधील Black Water/मैला कोणत्याही परिस्थितीत Over flow होणार नाही, याकरिता ग्रामपंचायतीने जनजागृती करावी.

II) नादुरूस्त/अतांत्रिकदृष्ट्या बांधण्यात आलेल्या सेप्टीक टँकची दुरूस्ती करावी.

III) गावातील द्विन पिट शौचालयाद्वारा तयार होणाऱ्या सोनखताबाबत संबधित ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांनी जनजागृती करावी.

❖ **<u>मैला मिश्रित सांडपाण्यावरील प्रक्रिया ( BLACK WATER TREATMENT) :-</u>**

- सेप्टीक टँक मधून बाहेर पडणाऱ्या मैला मिश्रित सांडपाण्याचा ( BLACK WATER ) कोणत्याही परिस्थितीत जमिनीवर इतरत्र पसरणार नाही, सांडपाण्याच्या नालीमध्ये जाणार नाही वा पाण्याच्या अस्तित्वातील स्त्रोतामध्ये मिसळणार नाही व त्यामुळे जलस्त्रोत दुषित होणार नाही, याची दक्षता ग्रामपंचायतीने घ्यावी. सेप्टीक टँक मधून बाहेर पडणारे मैला मिश्रित सांडपाणी (BLACK WATER) जिरविण्याकरिता शास्त्रोक्त पद्धतीच्या शोष खड्ड्याचा वापर करता येईल. याबाबत संबधित ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांनी जनजागृती करावी.

**इ) जिल्हा स्तरीय गोबरधनः- केंद्र शासनाचे पत्र क्रमांक S-१८०१७/१०/२०२०- SBM-III-DDWS- Part(I),दिनांक १२/०७/२०२१ नुसार निर्गमित केलेल्या गोबरधनच्या सुधारित मार्गदर्शक सूचना.**

--------------

## विवरणपत्र-क

**किमान वापर, पुर्नवापर, पुर्नचक्रिकरण व पुर्नप्राप्ती (Reduce ,Reuse, Recycle & Recover या अनुषंगाने संक्षिप्त टिप्पणी ( Concept Note)**

घनकचरा व सांडपाण्याचे संकलन, वहन आणि सुरक्षित व योग्य प्रक्रिया/विल्हेवाट म्हणजेच घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन. दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचरा व सांडपाण्याचा, मानवी जीवन/ आरोग्य व पर्यावरणावरील विपरित परिणाम लक्षात घेवून, शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यात यावे. या करिता घनकचरा व सांडपाण्यास एक साधन संपत्ती म्हणून पहावे.

**किमान वापर (Reduce)**

प्लास्टिक ही अविघटनशील वस्तू असल्याने व प्लास्टिक कचऱ्याद्वारे सद्यस्थितीतील दुर्भिक्ष्य लक्षात घेवून, दैनंदिन व्यवहारात प्लास्टिक वस्तूंचा किमान वापर करण्यात यावा. प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी उपलब्ध असलेले तांत्रिक व आर्थिक पर्याय, किफायतशीर नसल्याने, अशा वस्तूंचा किमान वापर करणेसाठी, ग्रामस्थांच्या वर्तणूकीमध्ये बदल होईल, याबाबत जनजागृती करावी. ग्रामस्थांकडून प्लास्टिकची खरेदी करताना, पुढील बाबींचा विचार करावा:-

- प्लास्टिक वस्तू खरेदी करण्यापूर्वी, वस्तुची निकड (अत्यावश्यक आहे किंवा कसे ) व सदर वस्तूस अन्य उपलब्ध पर्याय.
- ग्रामस्थांनी घराबाहेर जाताना कापडी पिशवी सोबत ठेवणे.
- शक्यतो टिकावू, दुरूस्तीयोग्य व पुन्हा पुन्हा वापरण्यायोग्य वस्तू खरेदी कराव्यात.
- Use and Throw व एकदाच वापरता येणाऱ्या (थर्मोकॉलच्या प्लेट, कप, बॅटरी इ.) वस्तू, खरेदी करू नये.

**पुर्नवापर** (Reuse)

प्लास्टिक कचऱ्याची कमीत कमी निर्मिती होईल, यासाठी पुर्नवापर होण्यासारख्या प्लास्टिक वस्तूंचा वापर करावा. याअनुषंगाने ग्रामस्थांनी पुढील बाबींचा विचार करावा:-

- जुन्या बरण्या, बाटल्या, भांडी व इतर सामग्री पुर्नवापर करणे.
- उपयोगात न येणा-या वस्तुंची गरजूंना विक्री करावी.
- पिशव्या बनवण्यासाठी जुन्या वृत्तपत्रांचा वापर करावा.
- शक्यतो, रिचार्ज होणाऱ्या बॅटरी वापरावे.
- घरातल्या टाकावू वस्तुंपासून नाविन्यपूर्ण वस्तू निर्मित करावी जसे- ( उदा:-जुन्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा झाडे लावण्याच्या कुंड्याकरिता, फ्लॉवरप्लॉट म्हणून वापर इ.)
- पुर्नवापर करण्यायोग्य वस्तु कचऱ्यामध्ये न टाकता, अशासकीय संस्थांना (NGO- Non Governmental Organization, CSO-Central Statistical Organization ) गरज असल्यास, पुर्नवापरासाठी देणे.

**पुर्नचक्रिकरण** (Recycle)

प्लास्टिक निरूपयोगी वस्तूचे, भौतिक अथवा रासायनिक पद्धतीने विघटन प्रक्रिया करणे व यामधून नवीन वस्तुची पुर्ननिर्मिती करणे म्हणजे पुर्नचक्रिकरण (Recycling). अप-सायकलिंग आणि डाऊन-सायकलिंग या दोन प्रकाराने पुर्नचक्रिकरण करावे. अप-सायकलिंग म्हणजे, जुन्या प्लास्टिक वस्तूचे त्याच्या पूर्वीच्या मुल्यांपेक्षा अधिक मूल्यांची वस्तू निर्माण करणे. डाऊन-सायकलिंग म्हणजे, जुन्या प्लास्टिक वस्तूचे त्याच्या पूर्वीच्या मुल्यांपेक्षा कमी मूल्यांची वस्तू निर्माण करणे.

**प्लास्टिक कचऱ्याचे पुर्नचक्रिकरणासाठी ग्रामस्थांनी पुढील बाबींचा विचार करावा:-**

- विघटनशील (Degradable) कचऱ्यापासून खत निर्मिती.
- प्लास्टिक/काच/धातू सारख्या अविघटनशील (Non-degradable) कचऱ्याचे पुर्नचक्रिकरण करण्यासाठी, अशा कचऱ्याची कचरा-व्यवसायिकांना विक्री करणे.

- प्लास्टिक कचऱ्याच्या योग्य संकलन/साठवण व्यवस्थेसाठी ग्रामस्तरावर प्लास्टिक क्रशर, कॉम्पॅक्टर इत्यादींची व्यवस्था PRO मार्फत करणे.

## पुर्नप्राप्ती (Recovery)

पुर्नप्राप्ती म्हणजे निरूपयोगी कचऱ्यापासून उर्जा निर्मिती करणे. जसे विघटनशील (Degradable) कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती व निरूपयोगी प्लास्टिक पासून इंधन निर्मिती करणे.

---XXXXX----

## विवरणपत्र-ड

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंमलबजावणी करिता केंद्र शासन/राज्य शासन/राज्य पाणी व स्वच्छता मिशन/ इतर अनुषंगिक संस्था इत्यादीद्वारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शन सूचना/ पुस्तिका/ नियमावली/माहिती इत्यादी.

| बाब | केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील लिंक | राज्य शासन /राज्य पाणी व स्वच्छता मिशन /इतर संस्थाच्या संकेतस्थळावरील लिंक |
|---|---|---|
| SBM Guidelines | https://swachhbharatmission.gov.in/SBMCMS/writereaddata/portal/images/pdf/sbm-ph-II-Guidelines.pdf | www.wsso.in https://water.maharashtra.gov.in/Site/Home/Index.aspx |
| Innovations / Products / Technologies Recommendation by Dr. Mashelkar committee | https://ejalshakti.gov.in/misc/InnovationAccrMC_Rep_S.aspx | |
| Compedium on Innovative Technology January २०१५ | https://jalshakti-ddws.gov.in/sites/default/files/Compendium_of_Innovative_Technologies.pdf | |
| Compedium on Innovative Technology July २०१५ | -------------- | |
| घनकचरा व्यवस्थापन Guidelines for solid and liquid waste management in rural areas | https://jalshakti-ddws.gov.in/sites/default/files/Primer%२०SLWM.pdf | |
| मॅन्युअल Manual: Biodegradable Waste Managemen | https://swachhbharatmission.gov.in/sbmcms/writereaddata/Portal/Images/pdf/Biodegradable_Waste_Management_Manual_English.pdf | |

| | |
|---|---|
| **सांडपाणी व्यवस्थापन** | |
| **मॅन्युअल**<br>Manual: Greywater Management | https://swachhbharatmission.gov.in/ sbmcms/writereaddata/Portal/Images/ pdf/Greywater_Management_Manual _English.pdf |
| **टुलकिट**<br>Grey Water Management Toolkit | https://swachhbharatmission.gov.in/ sbmcms/writereaddata/Portal/Images/ pdf/GWMtoolkit.pdf |
| **प्लास्टिक कचरा व्यवस्थापन** | |
| **मॅन्युअल**<br>Manual: Plastic Waste Management | https://swachhbharatmission.gov.in/ sbmcms/writereaddata/Portal/Images/ pdf/PWM_Manual_English_InnerPages.pdf |
| **टुलकिट**<br>Plastic Waste Management Toolkit | https://swachhbharatmission.gov.in/ sbmcms/writereaddata/Portal/Images/ pdf/PWMtoolkit.pdf |
| **मैला गाळ व्यवस्थापन** | |
| **मॅन्युअल**<br>Manual: Faecal Sludge Management | https://swachhbharatmission.gov.in/ sbmcms/writereaddata/Portal/Images/ pdf/Faecal_sludge_management_ manual_English.pdf |
| **टुलकिट**<br>Faecal Sludge Management Toolkit | https://swachhbharatmission.gov.in/sbmc ms/ writereaddata/Portal/Images/pdf/ FirstsetFSMtoolkit.pdf |
| **गोबरधन २०२१मार्गदर्शक पुस्तिका**Guidelines for Gobardhan | https://sbm.gov.in/gbdw२०/images/ Framework/Gobardhan.pdf |
| Framework for Gobardhan | https://sbm.gov.in/gbdw२०/images/Frame work/ Gobardhan_Framework.pdf |
| Clarification on implementation of GOBARDHAN plants | https://sbm.gov.in/gbdw२०/images/Frame work/ ImplementationofGOBARDHAN.pdf |

| | | |
|---|---|---|
| Regarding preparation of convergent action plan for implementation of Solid and Liquid waste management (including faecal septage and plastic Waste Management | https://jalshakti-ddws.gov.in/sites/default/files/action-plan-for-implementation-of-faecal-septage-plastic-waste-management.pdf | |
| Manual Reg Utilisation of 15th FC Funds | https://swachhbharatmission.gov.in/SBMCMS/writereaddata/portal/images/pdf/Manual_for_utilisation_of_15th_FC_tied_funds.pdf | |
| Manual for utilization of 15th Finance Commission tied grant to RLBs for water and sanitation for the period 2021-22 to 2025-26 | https://jalshakti-ddws.gov.in/documents/guidelines | |

********************************

**प्रपत्र १**

अर्जाचा नमुना

क्रमांक ---------------
गावाचेनांव/ग्रामपंचायत-
पंचायत समिती --------
जिल्हा परिषद ---------
दिनांक --------------

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती-----------

**विषय :-** घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत.

-------------- यागावासाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी,स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)टप्पा-II अंतर्गत प्रकल्पास मान्यता व निधी उपलब्धतेसाठी अर्ज करण्यात येत आहे.
२
i)केंद्र शासनाच्या जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर ग्रामपंचायत हागणदारीमुक्त म्हणून घोषित झालेली आहे. व सदर प्रकल्प राबविण्यासाठी या--- गावाचा वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समावेश करण्यात आला आहे.
ii)हे--- गाव नदी वा जलाशयाच्या काठावरीलआहे/नाही.

iii)प्रकल्प राबविण्यासाठी आराखड्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीकडे स्वत:च्या मालकीची वा शासकीय जागा उपलब्ध आहे.

iv) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती शाश्वतपणे करण्यात येईल व योजनेच्या देखभाल व दुरूस्तीसह अनुषंगिक खर्च, संबधित ग्रामपंचायतीने स्वनिधीमधून करण्यात येईल, याबाबतच्या ठरावासह हमीपत्र सोबत जोडले आहे.

v) -----ग्रामपंचायतीने शाश्वत स्वच्छता आराखडा तयार करून, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना सादर केला आहे व आराखड्यामधील (Sustainable Sanitation Plan) बाबींची पूर्तता होईल, याबावतचे हमीपत्र सोबत जोडले आहे.

vi)या------गावामध्ये, मागील ५ वर्षामध्ये, निर्मल भारत अभियान वा स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनांमधून, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण ) टप्पा-II अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपर्यंत प्रकल्प राबविण्यात आलेला नाही.

* कृतिसंगमाचा निधी उपलब्ध होईल याची खातरजमा सरपंच ग्रामसेवक व गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांनी केली आहे.

स्वाक्षरी सरपंच ग्राम पंचायत **स्वाक्षरीग्रामसेवक**

उपरोक्त बाबींची ग्रामपंचायत अभिलेखानुसार तपासणी केली आहे.

**विस्तार अधिका री**
**पंचायत समिती**

**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती**

## प्रपत्र ०२ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखडयासाठी कुटुंबस्तर सर्वेक्षण आणि माहिती संकलन

गावाचे नाव: , ग्रामपंचायत :

| कुटुंबाची सर्वसाधारण माहिती | | | | शौचालयाचा प्रकार | | | | सांडपाणी (ग्रे-वॉटर) अस्तित्वातील विल्हेवाट पद्धती | | | | | शौचालय सांडपाणी (ब्लॅक-वॉटर) विल्हेवाट पद्धती | | | | घनकचरा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वार्ड क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | कुटुंबातील सदस्यांची संख्या | एक शौच खड्डा | दोन शौच खड्डे | सेप्टिक टँक | इतर | शोषखड्डा | परसबाग | नाली/गटार | नदी | उघड्यावर | शोषखड्डा | गटार | उघड्यावर | इतर | कचरा वर्गीकरण होय/नाही | साधारणत: ओल्या कचऱ्याचे प्रमाण (कि. ग्रॅम) | स्वतःचा खत खड्डा | एकत्र/ सार्वजनिक खड्डा | बायोगॅस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०२- मध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत अस्तित्वातील उपांगासंबधात माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्यात यावे. )

* कोष्टकातील चौकोनामध्ये √ टिक करावे अन्यथा रिक्त ठेवावे.

उपरोक्त कोष्टकातील स्तंभ क्र. १८ येथे होय किंवा नाही असे नमूद करावे.

, तालुका : , जिल्हा :

| व्यवस्थापन | | | | घनकचरा विल्हेवाट (सुका कचरा) | | | | | | मैला गाळ व्यवस्थापन ( शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती) | | | | घरगुती घातक कचरा विल्हेवाट (गोळया - औषधे - सॅनिटरी नॅपकिन) | | | | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक कचरा कुंडी | उघड्यावर | ग्रामपंचायत संकलन | इतर | जाळती | विकती | कचरा कुंडी | नदीत फेकती | ग्रामपंचायत संकलन | इतर | खड्डा उपसून खत शेतात टाकतात | खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करुन मैला प्रक्रियेसाठी पाठवतात | सेप्टिक टाकी रिकामी करुन मैला गावाबाहेर उघड्यावर टाकून देतात | कचरा कुंडी | खड्ड्यात विल्हेवाट | जाळती | इतर | जनावरे संख्या |
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० | ४१ |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | |